समृध्द जीवन फुडस् इंडिया लिमिटेड या कंपनीविरूध्द दाखल झालेल्या (१) डेक्कन पोलीस स्टेशन गु.र.नं.३२३/२०१५ (२) चतुश्रृंगी पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं.३८४/२०१४ व (३) चाळीसगाव पोलीस स्टेशन, जळगाव गु.र.नं.६२/२०१३ चे प्रकरणी मा.विशेष न्यायालय, एम.पी.आय.डी.न्यायालय, शिवाजीनगर, पुणे मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील न्यायालयातील प्रकरणामध्ये विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या ॲङ श्री.प्रविण चव्हाण यांना व्यावसायिक फी मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्र. एसपीपी ०६१६/प्र.क्र.१५९/पोल-१०
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय ,मुंबई-४०० ००५,
दिनांक : २२.०१.२०१८

<u>संदर्भ</u> : विधी व न्याय विभाग अधिसुचना क्र. एसपीपी २०१७/युओआर १४/डी-१४ दिनांक १६ मार्च, २०१७

<u>शासन निर्णय</u> :-

समृध्द जीवन फुडस् इंडिया लिमिटेड या कंपनीविरूध्द दाखल झालेल्या (१) डेक्कन पोलीस स्टेशन गु.र.नं.३२३/२०१५ (२)चतुश्रृंगी पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं.३८४/२०१४ व (३) चाळीसगाव पोलीस स्टेशन, जळगाव गु.र.नं.६२/२०१३ चे प्रकरणी मा.विशेष न्यायालय, एम.पी.आय.डी.न्यायालय, शिवाजीनगर, पुणे येथील न्यायालयीन कामकाज पाहण्याकरिता **ॲङ श्री.प्रविण चव्हाण यांची** विधि व न्याय विभागाने दिनांक १६ मार्च, २०१७ च्या अधिसुचनेन्वये तसेच मा. उच्च न्यायालय मुंबई येथील कामकाज पाहण्याकरिता दिनांक २०.०६.२०१७ च्या पत्रान्वये विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. याबाबत ॲड. श्री. प्रविण चव्हाण यांना खालीलप्रमाणे व्यवसायीक फी अदा करण्यास शासन मान्यता देत आहे. या व्यतीरिक्त त्यांना अन्य कोणतीही फी वा भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

१) प्रतिदिन परिणामकारक सुनावणी फी रु.१०,०००/-

२) शासकीय नियमानुसार प्रवास खर्च

२. परिणामकारक सुनावणीचे दिवस संबंधीत प्रकरणाच्या पर्यवेक्षीय पोलीस उपायुक्त दर्जाहून कमी नाही, अशा अधिका-याकडून प्रमाणित करुन घेण्यात यावेत व कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त प्रदान होणार नाही, याची दक्षता घ्यावी. या व्यतिरिक्त त्यांना कोणतीही फी अनुज्ञेय असणार नाही.

३. यासाठी येणारा खर्च या विभागाच्या मागणी क्र. बी-१, २०५५ पोलीस - (००) १०९, जिल्हा पोलीस (००) (०१) जिल्हा पोलीस दल - (२०५५ ०१६८) - २८ व्यावसायिक सेवा या लेखाशीर्षाखालील त्या त्या आर्थिक वर्षाच्या मंजूर अनुदानातून व मासिक निधी विवरणपत्रानुसार भागविण्यात येईल.

४ . हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.३१९/२०१७/व्यय-७, दिनांक ०७.१२.२०१७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०१२३११३७५९०८२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dinesh Appaji Saste

Digitally signed by Dinesh Appaji Saste
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a49495d0d4b31e36ff1d612a85453ca984b74e28fd6f99cdf66e3e499969e942, cn=Dinesh Appaji Saste
Date: 2018.01.23 11:42:26 +05'30'

(दिनेश आ.सस्ते)
कार्यासन अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. पोलीस महासंचालकमुंबई ,महाराष्ट्र राज्य ,
२. विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र १ , मुंबई .
४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
६. ॲड.श्री. प्रविण चव्हाण, २३, एकदंत, एन-४, सेक्टर एच, सिडको, औरंगाबाद.
७. कार्यासन-१४, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. वित्त विभाग (व्यय- ७), मंत्रालय, मुंबई.
९. निवड नस्ती (पोल-१०).